**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ९६५/२०२०**
**शामराव वि. इराप्पा**
**निशाणी क्र.२४ लगत**

**फिर्यादीचा पुढील सरतपास फिर्यादीतर्फे विधीज्ञ श्री.एस.एम.भोंगळे यांचेमार्फत सुरु–**

आता मला मी दाखल केलेले पुराव्याचे शपथपत्र दाखवले. त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकुर बरोबर आहे. सदर शपथपत्रास यापुर्वी नि.क्र.२४ देण्यात आली आहे. आजरोजी मी संचिकेवर दाखल केलेले कागदपत्र मला दाखवले. संचिकेवर दाखल केलेला धनादेश हा मला आरोपीने दिलेला होता. सदर धनादेशावरील तारीख, रक्कम, त्यातील संपुर्ण मजकूर लिहून, त्यावर सही करुन आरोपीने मला दिला होता. सदर धनादेशास **नि.क्र.२९** देण्यात येत आहे. सदरचा धनादेश मी वटविण्यासाठी सातारा जिल्हा मध्यवर्ती सह. बँक, शाखा फलटण येथे टाकला होता. परंतु, सदरचा धनादेश अनादरीत झाला. त्याचा मेमो मी दाखल केला आहे. त्यास **नि.क्र.३०** देण्यात येत आहे. सदर धनादेश अनादरीत झाल्यानंतर पैशाची मागणी करण्याकरीता मी आरोपीस माझे वकिल श्री. बोराटे यांचे मार्फत दोन वेगवेगळया पत्त्यांवर दोन नोटीसा दिल्या. आता मला सदर नोटीसा दाखवण्यात आल्या. त्या त्याच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३१ व ३२** देण्यात येत आहे. सदर नोटीसा पोस्टाने पाठविल्याच्या पावत्या मी दाखल केल्या आहेत. त्यास एकत्रितपणे **नि.क्र.३३** देण्यात येत आहे. सदर नोटीसा आरोपीला मिळाल्याबाबत पोहोच पावत्या दाखल केल्या आहेत. त्यांना अनुक्रमे **नि.क्र.३४ व ३५** देण्यात येत आहेत. आरोपीने माझ्याकडून दि.०५.०५.२०१९ रोजी र.रु.१०,००,०००/– हातऊसने घेतले व सहा महिन्यात पैसे परतफेड करण्याबाबत पावती करुन दिली होती. ती पावती मला दाखवण्यात आली. त्यावर माझी व आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३६** देण्यात येत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपीतर्फे उलटतपासासाठी तहकुब करण्यात येत आहे.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

फलटण. (ए. एस. साटोटे)

दि.१०.०३.२०२६ ३ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, फलटण